





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा




रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ०७.०८.२०२५ | अंक नं. ११० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020







# अहिल्यानगरमार्गे १० ऑगस्टपासून सुरु होणार पुणे-नागपूर 'वंदे भारत एक्सप्रेस' : खा.निलेश लंके



नगर – अहिल्यानगर जिल्ह्यासाठी आणि विशेषतः अहिल्यानगर लोकसभा मतदारसंघातील प्रवाशांच्या सोयीसाठी आता नागपूर ते पुणे ही 'वंदे भारत एक्सप्रेस रेल्वे सेवा' सुरू करण्यास रेल्वे मंत्रालयाने हिरवा झेंडा दाखविला आहे. या गाडीला अहिल्यानगर येथे अधिकृत थांबा देण्यात आला असून जिल्ह्यातील प्रवाशांना आता जलद, आरामदायक आणि उच्च दर्जाच्या प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे खासदार निलेश लंके यांनी सांगितले.

पुणे येथे २३ जुलै रोजी पार पडलेल्या रेल्वे सल्लागार मंडळाच्या बैठकीत अहिल्यानगर स्थानकावर विविध गाड्यांना थांबा देण्याची मागणी खा.निलेश लंके यांनी केली होती. त्याची दखल घेऊन वंदे भारत एक्सप्रेसला थांबा देण्यात आला आहे. १० ऑगस्ट रोजी नागपूरहून या रेल्वे सेवेला सुरूवात होणार असून अजनी, नागपूर येथून सोमवारवगळता आठवड्यातून ६ दिवस ही गाडी पुण्याकडे प्रस्थान करणार आहे, तर पुण्याहून मंगळवारवगळता आठवड्यातून ६ दिवस ही गाडी अजनी, नागपूरकडे प्रस्थान करणार आहे.

अजनी, नागपूरहून पुण्याकडे जाताना या गाडीचे अहिल्यानगर स्थानकावर सायंकाळी ७ वाजून ३५ मिनिटांनी आगमन होईल व ७ वाजून ३७ मिनिटांनी पुण्याकडे प्रस्थान होईल. पुण्याहून अजनीकडे प्रस्थान करताना अहिल्यानगर स्थानकावर ही गाडी सकाळी ८ वाजून ३३ मिनिटांनी पोहोचेल व ८ वाजून ३५ मिनिटांनी अजनी, नागपूरकडे प्रस्थान करेल. अजनी, नागपूर स्थानकावरून ही एक्सप्रेस सकाळी ९ वाजून ५० मिनिटांनी सुटेल तर पुण्याहून सकाळी ६ वाजून २५ मिनिटांनी नागपूरसाठी सुटणार आहे.

### 'वंदे भारत' मुळे सकारात्मक बदल होईल

वंदे भारतसारखी उच्च दर्जाची सेवा जिल्ह्याला मिळणे ही ऐतिहासिक बाब आहे. त्यामुळे रोजगार, शिक्षण, व्यापार, आरोग्य आणि संपर्क यामध्ये मोठ्या प्रमाणावर सकारात्मक बदल होईल. नागपूर आणि पुणे या दोन महत्वाच्या शहरांशी जिल्ह्याचा थेट संपर्क सुलभ होईल.

### विशेष उद्घाटन सोहळ्याचे आयोजन

ही सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांचे खा. लंके यांनी आभार मानले. ही सेवा केवळ प्रवासाचे अंतर कमी करणार नाही तर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारी ठरेल, असे सांगत खा. लंके यांनी सांगितले की, या नव्या सेवेसंदर्भात लवकरच अहिल्यानगर स्थानकावर विशेष उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे.















जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक




# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com


## प्रेरणादायी अक्षरधन

'मुसाफिर'–९८२२०२०६९१

### म – मराठीचा...

केंद्र सरकारने मराठी भाषेला नुकताच अभिजात भाषेचा दर्जा दिला. साधुसंतांसह नामवंत साहित्यिक, लेखकांनी भाषेच्या या समृद्धतेला अधिक उंचीवर नेवून ठेवलय.

आज शासनाच्या मराठी भाषा विभागाच्या वतीने मराठी भाषेच्या विकास व संवर्धनासाठी अनेक प्रकल्प होत आहे. या प्रयत्नांत सर्वसामान्यांना सामावून घ्यावे लागले आहे. या प्रयत्नांत सर्वसामान्यांना सामावून घ्यावे लागेल. शालेय विद्यार्थी, कॉलेजच्या तरुणाईला चांगले साहित्य, कसदार गप्पा गोष्टींशी परिचीत करावे लागेल.

मराठी भाषेच्या विकासाच्या प्रसाराचे दायित्त्व हे फक्त शासन, संस्थांपुरते मर्यादित राहून चालणार नाही तर त्याला व्यापक जनाधार असणे गरजेचे आहे.

आज चीन, जपान, जर्मनी, रशिया इ. अनेक देश सांस्कृतिक डिप्लोमसीचा भाग म्हणून आपापल्या मायभाषेचा जगभरात प्रचार–प्रसार करण्यासाठी करोडो रुपये खर्च करीत आहेत. यामुळे भाषेच्या अस्मितेसह सांस्कृतिक व व्यपारवृद्धी शक्य होते. पण यात राजकारण आले तर?

जागतिकीकरणाच्या स्पर्धेत जगाशी पैज लावण्यास निघालेल्या मराठी समाजाला आपल्या अमृताशी पैंजा जिंकणाऱ्या मराठीची थोडीशी ओळख जरी जगाला करुन देता आली तरी अर्धी लढाई जिंकली असेच म्हणता येईल. हे आव्हान मराठी बंधू भगिनी, साहित्यिकांनी स्वेच्छेने स्विकारावे आणि मराठी भाषेचा झेंडा केवळ महाराष्ट्र देशातच नव्हे तर परदेशातही अभिमानाने फडकवावा.

जगभर प्रादेशिकवाद आणि राष्ट्रीय अस्मितेचे वारे वाहत असताना मराठी व अन्य भारतीय समाजाने आपापल्या भाषाविषयक मानसिक द्विधा मन:स्थितीतून बाहेर पडणे ही काळाची गरज आहे.

मातृभाषा अनन्यसाधारण असते. अत्युच्च पातळीवरील एखादी भावना, अध्यात्म किंवा आशयघन विश्लेषणाची अनुभूती जितकी सहजतेने मातृभाषेत होते तेवढी अन्य भाषेत येईलच असे नाही. आजकाल होतय काय मुले पालक घरात एक भाषा बोलतात. (उदा. गुजराथी, तेलगू) समाजात मराठीत तर शिक्षण इंग्रजी माध्यमातून घेतात. सगळीकडे म–मराठीचा वाढला पाहिजे.

# बिहार येथील तीन युवकांनी 'रेकी' द्वारे पाळत ठेवून अहिल्यानगरमधील 'डी.चंद्रकांत' दुकानात केली चोरी

## पुणे विमानतळावर पोलिसांनी केली अटक

नगर – शहरातील चितळे रस्त्यावरील डी. चंद्रकांत नामक दुकान फोडून २ लाख ५० हजारांची रोकड चोरणाऱ्या तसेच अन्य काही ठिकाणी चोरीचा प्रयत्न करणाऱ्या तिघा चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखेच्या विशेष पथकाने अटक केली आहे. हे संशयित आरोपी त्यांच्या मुळ गावी बिहारला पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना त्यांना अत्यंत हुशारीने पुणे विमानतळावरून ताब्यात घेण्यात आले.

लक्ष्मण राजाराम दुलम (रा. सातभाई मळा, बालिकाश्रम रस्ता, अहिल्यानगर) यांच्या मालकीच्या डी. चंद्रकांत दुकानात अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करत २ लाख ५० हजारांची रोकड चोरून नेली होती. तसेच शेजारच्या हॉटेलमध्येही चोरीचा प्रयत्न करण्यात आला होता. ही घटना ४ ऑगस्टच्या पहाटे घडली होती. याप्रकरणी दुलम यांच्या फिर्यादीवरून कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या घटनेनंतर तपासासाठी पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक नियुक्त केले. या पथकात सहायक पोलीस निरीक्षक हरीश भोये, उपनिरीक्षक राजेंद्र वाघ तसेच पोलीस अंमलदार शाहिद शेख, लक्ष्मण खोकले, फुरकान शेख, सोमनाथ झांबरे, रोहित येमुल, सागर ससाणे, अमृत आढाव, प्रशांत राठोड, भगवान धुळे, अर्जुन बडे यांचा समावेश होता.



नगरमध्ये डी. चंद्रकांत दुकानात चोरी करणारे चोरटे पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

पथकाने घटनास्थळी जाऊन, तांत्रिक तपास, गुन्हेगारी पार्श्वभूमीचा अभ्यास, गुप्त माहिती यांचा योग्य वापर करत संशयित आरोपींचा माग काढला. तपासात हे संशयित आरोपी पुणे विमानतळावरून बिहारकडे पळ काढण्याच्या तयारीत असल्याचे समोर आले. पथकाने तत्काळ पुणे विमानतळावर धाव घेत संशयित आरोपी मेहताब उर्फ अयान उर्फ जल्ला सफियाना शेख (वय २०, रा. बौध्दनगर, पत्राशेड, पुणे), असफाक दिलशाद शेख (वय १९, रा. काळेवाडी, पुणे) व निसार अली नजर मोहंमद (वय ३६, रा. वाघोली, ता. हवेली, जि. पुणे) यांना अटक केली. अटक कारवाईदरम्यान सीआयएसएफच्या निरीक्षक रूपाली ठोके व नियंत्रण कक्षातील दीपक वाघमारे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

संशयित आरोपींनी केवळ अहिल्यानगरच नव्हे, तर पुणे शहरातही एक घरफोडी केल्याची कबुली दिली आहे. विशेष बाब म्हणजे यातील एक संशयित आरोपी सध्या खुनाच्या गुन्ह्यात जामीनावर बाहेर आहे व अलीकडेच गुन्हेगारी क्षेत्रात सक्रीय झाला आहे.

### अगोदर रेकी केली, दुचाकी चोरली मग दुकाने फोडली

संशयित आरोपी असफाक शेख याने चोरीतील १ लाख ९८ हजार २०० रूपये हे त्याच्या बहिणीच्या बँक खात्यावर एटीएमव्दारे ऑनलाईन वर्ग केल्याचे कबूल केले आहे. दरम्यान, या तिघांकडून चोरी करण्यापूर्वी संबंधित परिसराची रेकी केली जात होती. चोरी करण्यापूर्वी आपले वाहन रेल्वे किंवा बस स्थानकावर पार्क करायचे, आणि ज्या भागात चोरी करायची त्या भागातील वाहन चोरी करून काम झाल्यानंतर ते वाहन पुन्हा त्याच परिसरात सोडून आपल्या वाहनातून पळ काढण्याची पध्दत त्यांनी वापरत असल्याचे पोलिसांच्या तपासातून समोर आले आहे.

# राज्यात दोन दिवस मेघगर्जनेसह पाऊस

## अहिल्यानगरसह २३ जिल्ह्यांमध्ये 'अलर्ट' जारी; हवामान खात्याचा अंदाज

मुंबई – राज्यामध्ये सध्या पावसाचा जोर फारसा नसला तरी ८ ऑगस्टपर्यंत राज्याच्या काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पूर्व–मध्य अरबी समुद्र ते बंगालच्या उपसागराच्या मध्य या पट्ट्यामध्ये पूर्व–पश्चिम द्रोणीय स्थिती निर्माण झाली आहे. या दोन्ही प्रणालींमुळे राज्यामध्ये मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वाढली असून हवामान विभागाने अहिल्यानगरसह राज्यातील २३ जिल्ह्यांत अलर्ट जारी केला आहे.

७ आणि ८ ऑगस्ट रोजी दक्षिण कोकणामध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. तसेच मध्य महाराष्ट्रात अहिल्यानगर, पुणे, पुणे जिल्ह्याचा घाट परिसर, कोल्हापूर, कोल्हापूर जिल्ह्याचा घाट परिसर, सातारा, सांगली, सोलापूर येथे मेघगर्जनेसह पाऊस पडू शकेल. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथे ८ ऑगस्ट रोजी तर परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव येथे ७ आणि ८ ऑगस्ट रोजी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊसही पडू शकतो. विदर्भात भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ येथे मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मुंबई, ठाणे, पालघर या परिसरात मात्र हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

या पावसामुळे तापमानात फारसा दिलासा मिळण्याची शक्यता नाही, असा अंदाज आहे. संपूर्ण विदर्भ, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, नाशिक व पुणे जिल्ह्यातील पूर्व भाग अशा १५ जिल्ह्यांत दुपारच्या कमाल तापमानात सरासरीपेक्षा ३ ते ४ अंश सेल्सिअसने वाढ झाली आहे. या जिल्ह्यांमध्ये कमाल तापमान ३२ ते ३३ अंशांदरम्यान नोंदले जात आहे.

# आंध्र प्रदेशातील क्रिप्टो करन्सी फसवणूक प्रकरणात नगरमधील प्रमुख संशयित आरोपी तरुणाला अटक

नगर – आंध्र प्रदेश राज्यातील मंगलागिरी पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या क्रिप्टो करन्सी फसवणुकीच्या गुन्ह्यातील प्रमुख पसार संशयित आरोपी अभिजीत संजय वाघमारे (वय ३१, रा. विराज कॉलनी, अहिल्यानगर) याला तोफखाना पोलिसांच्या पथकाने स्थानिक पातळीवर शोध घेऊन अटक केली. ही कारवाई आंध्र प्रदेश राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या मदतीने करण्यात आली.



आंध्र प्रदेशातील क्रिप्टो करन्सी फसवणूक प्रकरणात प्रमुख आरोपी असलेल्या नगरच्या तरुणाला अटक केल्यानंतर त्याच्या समवेत तोफखाना पोलिसांचे पथक.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगलागिरी पोलीस ठाणे, आंध्र प्रदेश येथे आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास आंध्र प्रदेशच्या राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडून सुरू असून, अभिजीत वाघमारे हा या गुन्ह्यात पसार होता. या संशयित आरोपीच्या अटकेसाठी आंध्र प्रदेशमधून विशेष पथक अहिल्यानगरमध्ये दाखल झाले होते. त्या पथकाने तोफखाना पोलिसांकडे मदत मागितली. तोफखाना पोलिसांनी तत्काळ कारवाई करत त्यांच्या पथकासोबत समन्वय साधून शोधमोहीम राबवली. संशयित आरोपी अभिजीत वाघमारे हा पळून जाण्याच्या तयारीत असताना त्याला ताब्यात घेण्यात आले व पुढील तपासासाठी आंध्र प्रदेश गुन्हे अन्वेषण विभागाच्या अधिकाऱ्यांच्या ताब्यात देण्यात आले.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, नगर शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी अमोल भारती यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या सूचनेनुसार अंमलदार अब्दुलकादर इनामदार, सुजय हिवाळे, महेश पाखरे, शफी शेख यांच्या पथकाने केली.

## सुभाष चिंतावार यांचे अल्प आजाराने निधन



नगर – शहरातील भवानीनगर परिसरातील रहिवासी व धनलक्ष्मी कृषी सेवा केंद्राचे संचालक सुभाष जनार्दन चिंतावार (वय ७७) यांचे नुकतेच आजाराने निधन झाले. ते धार्मिक वृत्तीचे व मनमिळावू स्वभावाचे होते. महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक म्हणून त्यांनी काम पाहिले. त्यांच्या पश्चात दोन मुली, दोन मुले असा परिवार आहे. अष्टविनायक ब्लड सेंटरचे प्रशासकीय अधिकारी जितेंद्र पलिकुंडवार यांचे ते दाजी होत.

## सुग्राबी आत्तार यांचे वृद्धापकाळाने निधन



नगर – नगर तालुक्यातील खडकी येथील रहिवासी सुग्राबी गुलाबभाई आत्तार (वय ८५) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचा दफनविधी खडकी येथील कब्रस्तानमध्ये करण्यात आला. त्यांचा बांगडीचा व्यवसाय होता. त्यांच्या मागे १ मुलगा, ३ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. खडकी येथील सेतु केंद्र चालक युनुस गणीभाई आत्तार यांच्या त्या आजी होत.

# गाडीचे कर्ज न फेडता परस्पर विक्री करुन ६ लाख ४१ हजार रुपयांची केली फसवणूक

नगर – पारनेर तालुक्यातील सारोळा आडवाई येथील एका शेतकऱ्याची ६ लाख ४१ हजार रुपयांची अशोक लेलँड कंपनीची जीतो गाडी विश्वास संपादन करुन घेऊन, तिचे लोन न भरता ती परस्पर तिसऱ्याला विकून शेतकऱ्याची फसवणूक केल्याची ११ ऑगस्ट २०२४ पासून ते ५ऑगस्ट २०२५ दरम्यान घडली आहे. या प्रकरणी पारनेर पोलिस ठाण्यात ६ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या बाबत नंदकुमार माधव आबुज (वय ५२, रा. सारोळा आडवाई, ता. पारनेर) यांनी पारनेर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की योगेश ऊर्फ अशोक मोहन कापसे (रा.बाराबाभळी,ता. नगर) याने फिर्यादीच्या मालकीची अशोक लेलँड जितो गाडी (क्र. एम एच १६ सी डी ४४९०) ११ ऑगस्ट २०२४ पासून विश्वास संपादन करुन ताब्यात घेतली. गाडीचे लोन भरतो, फोरक्लोज करुन निल दाखला देतो, असे सांगून फिर्यादीचा विश्वास संपादन करुन तो गाडी घेऊन गेला. परंतु त्याने गाडीचे लोन भरले नाही तसेच गाडीचे फोर क्लोज न करता ती फिर्यादीस परत न देता व फिर्यादीस ती सापडू नये म्हणून परस्पर नांदेड येथील एका इसमास विकून टाकली. फिर्यादीचा विश्वासघात आणि आर्थिक फसवणूक झाल्याने त्यांनी या प्रकरणी पारनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. या फिर्यादीवरुन योगेश कापसे याच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (४), ३१६(२) अंतर्गत फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक चांगदेव हंडाळ हे करीत आहेत.

# वडगाव गुप्ता शिवारातून वीजपंपासह साहित्याची चोरी

नगर – नगर तालुक्यातील वडगाव गुप्ता शिवारातील शेत जमिनीत असलेले २२ हजार रुपये किमतीचे जलभुमी कंपनीचे वीज पंपासह साहित्य चोरट्यांनी चोरुन नेल्याची घटना ५ ऑगस्ट रोजी मध्यरात्री १२.१५ वाजता ते ६ ऑगस्ट रोजी दुपारी ३.४५ वाजेच्या दरम्यान घडली आहे.

या बाबत जयराम भाऊसाहेब घोरपडे (वय ४२, रा. वडगाव गुप्ता, ता.नगर) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी यांची वडगाव गुप्ता शिवारात शेतजमीन आहे. त्या शेतजमिनीतील विहिरीवर असलेली १० हजार रुपये किमतीची जलभुमी कंपनीचा वीजपंप, ४ हजार रुपये किंमतीचा एक पाईप, ८ हजार रुपये किमतीची केबल वायर असे एकूण २२ हजार रुपये किंमतीचे साहित्य अज्ञात चोरट्याने चोरुन नेले. या घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक चौधरी, पोलीस हवालदार राजू सुद्रीक, पोलीस हवालदार सांगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात जयराम घोरपडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला, अधिक तपास पोलीस हवालदार राजू सुद्रिक हे करीत आहेत.

### केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे प्रादेशिक संचालक

## महेश धर्माधिकारी यांचे चेनई येथे निधन



नगर – केडगाव येथील रहिवासी असणारे चेन्नई येथे कार्यरत असणारे केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचे (C.B.S.E.) प्रादेशिक संचालक महेश दत्तात्रय धर्माधिकारी (वय ५७) यांचे चेन्नई येथे नुकतेच निधन झाले.

दिल्ली, अजमेर, पटना, भुवनेश्वर, पुणे, त्रिवेंद्रम, चेन्नई येथे त्यांचा सेवा कार्यकाल गेला. धर्माधिकारी यांचे शालेय शिक्षण कोपरगाव तालुक्यातील सावळी विहीर येथे झाले. तर महाविद्यालय शिक्षण अहमदनगर महाविद्यालयात झाले. त्यांना गायनाची आवड होती. त्यांच्या मागे आई, पत्नी, दोन मुले आणि मुलगी असा परिवार आहे.

### लष्करातील सेवानिवृत्त सुभेदार

## हिम्मतराव भोईटे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – लष्करातून सेवानिवृत्त झालेले सुभेदार हिम्मतराव भोईटे (वय ८४) यांचे ४ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या मागे दोन मुलगे, दोन मुली, बहिणी, सुना आणि नातवंडे असा परिवार आहे.

घाणेगाव (ता. पारनेर, जि. अहिल्यानगर) या गावातील हिम्मराव भोईटे हे १९६१ मध्ये लष्करात भरती झाले होते. भारत–पाकिस्तानमध्ये झालेल्या १९६५ आणि १९७१च्या युद्धामध्ये ते प्रत्यक्षात सहभागी झाले होते. युद्धामध्ये केलेल्या विशेष कामगिरीबद्दल माजी राष्ट्रपती आर वेंकटरामन यांच्याकडून प्रशस्तिपत्रक देऊन सन्मानित करण्यात आले होते. लष्करातील २८ वर्षांच्या प्रदिर्घ सेवेनंतर १९८९ मध्ये आसाममधून ते सेवानिवृत्त झाले होते. लष्करातील आणि दोन्ही युद्धातील आठवणी ते नेहमी सांगत. युद्धामध्ये लढत असताना शत्रूवर केलेला हल्ला, गोळ्या अथवा बॉम्बचा अनुभव सांगायचे. लष्करातून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी शेती व्यवसायात लक्ष घातले होते. अल्पावधीतच प्रगतशील शेतकरी म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. परिसरामध्ये नाना या नावाने ते परिचीत होते.

घाणेगाव येथे शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. शेतकरी राजू आणि दिपक हे त्यांचे पुत्र होत तर आयटी इंजिनिअर आकाश भोईटे हे त्यांचे नातू होत. नानांच्या सल्ल्यानंतर गावातील अनेक युवक लष्करात सहभागी झाले आहेत.

## केडगाव बायपास चौकात अपघात, एकाचा मृत्यू

नगर – नगर–पुणे महामार्गावर केडगाव बायपास चौक परिसरात झालेल्या वाहन अपघातात गंभीर जखमी झालेल्या इसमाचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना ५ ऑगस्ट रोजी घडली. विठ्ठल भिमराव गंधाले (वय ४१, रा. रामपुरी ता. मानवत, जि. परभणी) असे मृत इसमाचे नाव आहे.

विठ्ठल गंधाले यांचा अपघात ५ ऑगस्ट रोजी दुपारी ३.३१ वाजता केडगाव बायपास चौक परिसरात झाला होता. अपघातात ते गंभीर जखमी झाल्याने नागरिकांनी त्यांना औषधोपचाराकरीता तात्काळ पॅसिफिक हॉस्पिटल येथे दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. या प्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात पॅसिफिक हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रशांत जाधव यांच्या अहवालानुसार आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास पोलीस हवालदार भरत गाडीलकर हे करीत आहेत.

## मृत अनोळखी इसमाची ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

नगर – शहरातील मार्केट यार्ड येथील भीमाशंकर बिल्डिंग समोर २८ जुलै रोजी बेशुद्धअवस्थेत मिळून आलेल्या अंदाजे ५५ वर्षीय अनोळखी इसमाचा जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारा दरम्यान २९ जुलै रोजी मृत्यू झाला आहे. पोलिसांकडून त्याची ओळख पटविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. या प्रकरणी सिव्हील हॉस्पीटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सचिन शिंदे यांचे अहवालानुसार कोतवाली पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास पोलीस हवालदार योगेश कवाष्टे हे करीत असून अनोळखी इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेण्यात येत आहे. याबाबत कोणाला काही माहिती असल्यास त्यांनी कोतवाली पोलीस ठाण्यात फोन नंबर ०२४१ २४१४११७ या फोनवर संपर्क करावा, असे आवाहन कोतवाली पोलिसांनी केले आहे.

# रंगभवन संकुलातील ३६ थकबाकीदार गाळेधारकांना अहिल्यानगर महापालिकेच्या जप्ती कारवाईच्या नोटीसा

## तत्काळ थकबाकी न भरल्यास गाळे ताब्यात घेणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – सर्जेपूरातील रंगभवन व्यापारी संकुलातील ३९ पैकी ३६ गाळेधारकांकडे महानगरपालिकेची २ कोटी १५ लाख रुपयांची थकबाकी आहे. वारंवार संधी देऊनही थकीत भाडे न भरल्यामुळे या ३६ गाळेधारकांना महानगरपालिकेने जप्ती कारवाईच्या नोटीसा बजावल्या आहेत. तत्काळ संपूर्ण थकबाकी न भरल्यास गाळे जप्त करून ताब्यात घेण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

बुधवारी झालेल्या आढावा बैठकीतही मार्केट विभागाकडून कारवाईची माहिती घेत थकबाकीदारांवर जप्ती कारवाई सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. सर्जेपुरा रंगभवन व्यापारी संकुलातील ४१ पैकी ३९ गाळे भाडेतत्वावर देण्यात आले आहेत. त्यापैकी तीन गाळे बंद आहेत. उर्वरित ३६ गाळेधारकांना २.१५ कोटींच्या थकबाकीपोटी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१ ब नुसार गाळा ताब्यात घेण्याच्या नोटीस बजावण्यात आल्या आहेत.

महापालिकेने थकबाकीदार गाळेधारकांना अनेकवेळा थकबाकी भरण्यासाठी संधी दिली आहे. रंगभवन व्यापारी संकुलातील सर्व ४१ गाळेधारकांचे करार संपुष्टात आलेले आहेत. सद्यस्थितीत या ठिकाणी १९ पोटभाडेकरु असल्याचे महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात समोर आले आहे. तर, ११ गाळेधारकांनी महापालिकेची परवानगी न घेता गाण्यांमध्ये फेरबदल केले आहेत. महानगरपालिकेच्या आवाहनाला प्रतिसाद देऊनही थकबाकी जमा केली जात नसल्याने सर्व थकबाकीदार गाळेधारकांना जप्तीच्या नोटीसा बजावल्या आहेत. त्यांना मुदत देण्यात आली आहे. या मुदतीत त्यांनी तात्काळ संपूर्ण थकबाकी न भरल्यास गाळे ताब्यात घेण्यात येणार असल्याचे यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

# चोरीच्या मोटारसायकलवर फिरणाऱ्या तरुणाला पकडले

नगर – चोरीची मोटार सायकल घेवून संशयित रित्या फिरणाऱ्या तरुणास एमआयडीसी पोलिसांनी पकडून त्याच्याकडील चोरीची मोटारसायकल जप्त केली. ही कारवाई एमआयडीसी हद्दीतील गजानन कॉलनी, नवनागापूर येथे ६ ऑगस्टला पहाटे ५ वाजता करण्यात आली.

एमआयडीसी पोलिसांना नवनागापूर येथील गजानन कॉलनी जवळ एक तरुण नंबर नसलेल्या एका मोटारसायकल वरुन संशयितरित्या वावरताना दिसल्याने पोलिसांनी त्यास थांबवून त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्याचे नाव अजय याकोब पठारे (वय २७, रा. लालटाकी, भारस्कर कॉलनी, अ.नगर) असे असल्याचे सांगितले. पोलिसांनी त्याच्याकडे मोटारसायकल बाबत विचारणा केली असता त्याने पोलिसांना उडवाउडवीची उत्तरे दिली. तसेच मोटारसायकलच्या मालकी हक्कासंबंधी कोणतेही कागदपत्र सादर करु शकला नाही. यावरुन सदर मोटारसायकल चोरीची असल्याची पोलिसांना खात्री झाल्याने पोलिसांनी विना नंबर असलेली मोटारसायकल जप्त करुन अजय पठारे यास ताब्यात घेतले. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल नवनाथ दहिफळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अजय पठारे याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १२४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.


यु फोम, ब्रॉन्डेड फोम, हिटलॉन फोम, फोम मॅट्रेस्, बेड बॅक, सोफा क्लॉथ, फर्निशीन क्लॉथ, वेलवेथ क्लॉथ, सोफा कष्टर्स, सोफा रनर पट्टी, फ्रेमसह नविन सोफा तयार करुन मिळेल

गुलाबचंद कारपेटवाला
खिस्तगल्ली, जुना कापड बाजार मागे, अहमदनगर.
मो. ९४२२३३९४६०,९४२२३३९४४२,९४२२४५४००५

# पत्नीच्या आजारपणाची वैद्यकीय देयके ३ वर्षे उलटूनदेखील न मिळाल्याने जालिंदर बोरुडे यांचा १५ ऑगस्टला मुंबई मंत्रालय येथे आमरण उपोषण

नगर – पत्नीच्या आजारपणाची वैद्यकीय देयके तीन वर्षे उलटून देखील न मिळाल्याने जालिंदर बोरुडे यांनी १५ ऑगस्ट रोजी मुंबई मंत्रालय येथे आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. सदर वैद्यकीय बीलाची देयके तात्काळ मिळण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जलसंपदा विभागाच्या सचिवांना निवेदन पाठविण्यात आले आहे. निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी स्विकारले. यावेळी जालिंदर बोरुडे, रतन तुपविहीरे, सयाजी वाव्हळ, इंजि. राजहंस देसाई उपस्थित होते.


पत्नीच्या आजारपणाची वैद्यकीय देयके तात्काळ मिळण्यासंदर्भात जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत जलसंपदा विभागाच्या सचिवांना निवेदन पाठविण्यात आले आहे. निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांनी स्विकारले. यावेळी जालिंदर बोरुडे, रतन तुपविहीरे, सयाजी वाव्हळ, इंजि. राजहंस देसाई उपस्थित होते.

जालिंदर बोरुडे अहिल्यानगर पाटबंधारे विभागात कार्यरत असताना त्यांच्या पत्नी हेमलता बोरुडे या निमोनियाने आजारामुळे रुबी हॉस्पिटल पुणे येथे ॲडमिट होत्या. जवळपास २७ दिवस अतिदक्षता विभागात औषधोपचार सुरु असताना त्यांचे ३१ ऑगस्ट २०२२ रोजी निधन झाले. त्यांच्या औषधोपचाराच्या खर्चाची रक्कम १३ लाख ३ हजार ९९३ रुपयाची वैद्यकीय देयके अधीक्षक अभियंता लाभक्षेत्र नाशिक प्राधिकरण कार्यालयाकडून जलसंपदा सचिव यांच्याकडे सादर करण्यात आले आहे. यासंदर्भात दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही वैद्यकिय देयके मिळण्याबाबत काही कारवाई झालेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

औषधोपचारासाठी कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम न घेतल्याने नातेवाईक, मित्रमंडळी यांच्याकडे उसनवारी पैसे जमा करुन हॉस्पिटलचे बील अदा करण्यात आले. सदरचे वैद्यकीय बिलाची रक्कम अद्याप पर्यंत न मिळाल्यामुळे ज्यांच्याकडून उसनवारी पैसे घेतले आहेत, त्यांनी त्यांची रक्कम वेळेवर परत मिळण्यासाठी तगादा लावला आहे. ही रक्कम परत करू शकलो नसल्याने, त्यांचे आर्थिक व्यवस्थापन बिघडले आहे. त्यांच्याकडून सातत्याने मानहानी होत असून, तोंड चुकवून रहावे लागत आहे. झालेली उसनवारी व वैद्यकीय देयके मिळत नसल्याने आर्थिक व मानसिक स्वास्थ्य बिकट झाले असल्याचे बोरुडे यांनी निवेदनात म्हटले आहे.

याप्रकरणी जलसंपदा मंत्री व जलसंपदाचे सचिव यांच्याकडे वेळोवेळी पाठपुरावा करूनही वैद्यकीय देयका संदर्भात प्रश्न सोडविण्यात आलेला नाही. दोन वर्षे उलटून देखील वैद्यकीय देयकाची रक्कम मिळत नसल्याने मुंबई येथे १५ ऑगस्ट पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. यावरही काही निर्णय न झाल्यास भविष्यात आत्मदहन करण्याचे त्यांनी म्हटले आहे.


कृषि महोत्सवाचे याची नोंद इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली. विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व डॉ.दीपक हरके यांच्या हस्ते सराला बेटचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांना प्रदान करण्यात आले.

# देशातील सर्वात मोठे कृषि प्रदर्शनाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले प्रदान

नगर – योगीराज सद्गुरू श्री गंगागिरी महाराज यांच्या १७८ व्या अखंड हरिनाम सप्ताहात कृषि महोत्सव देवगाव शनी येथे आयोजित करण्यात आला. या महोत्सवात ३०० स्टॉल द्वारे संरक्षित शेती, पाणी नियोजन, कृषी निविष्ठा, यंत्रसामग्री, पशुधन, जैव, ऊर्जा, वाटिका व शेती लघू उद्योग अशी विभागवार दालने उभी करण्यात आलेली होती. याची नोंद इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये करण्यात आली. विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व इंडिया स्टार वर्ल्ड रेकॉर्डचे राष्ट्रीय सचिव डॉ. दीपक हरके यांच्या हस्ते सराला बेटचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांना प्रदान केले. यावेळी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा (तापी, विदर्भ आणि कोकण), कुंभमेळा आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, वैजापूरचे आमदार रमेश बोरनारे उपस्थित होते.


केडगावात नागरिकांच्या आरोग्यासाठी स्वखर्चाने कचरा गाडी प्रभाग १६ मध्ये संदीप (दादा) कोतकर युवा मंचच्या वतीने अध्यक्ष भूषण अशोक गुंड यांनी नागरिकांच्या आरोग्यासाठी पुढाकार घेत स्वखर्चातून कचरा संकलनासाठी स्वतंत्र कचरा गाडी उपलब्ध करून दिली.

# केडगावात नागरिकांच्या आरोग्यासाठी स्वखर्चाने कचरा गाडी

## भूषण गुंड यांचा पुढाकार

नगर – केडगाव मधील प्रभाग क्रमांक १६ मध्ये गेल्या अनेक दिवसांपासून अस्वच्छतेचे साम्राज्य पसरले होते. महानगरपालिकेच्या घंटागाड्या फिरत नसल्यामुळे रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचून दुर्गंधी, डास व रोगांचा प्रादुर्भाव वाढण्याचा धोका निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर संदीप (दादा) कोतकर युवा मंचच्या वतीने अध्यक्ष भूषण अशोक गुंड यांनी नागरिकांच्या आरोग्यासाठी पुढाकार घेत स्वखर्चातून कचरा संकलनासाठी स्वतंत्र गाडी उपलब्ध करून दिली.

या उपक्रमांतर्गत केवळ कचरा उचलणे नव्हे तर परिसरातील झाडी, गवत, झाडांच्या लोंबकळणाऱ्या फांद्या कापून संपूर्ण परिसरात स्वच्छतेची चळवळ राबवण्यात आली. परिसरात ज्या ठिकाणी स्वच्छतेसाठी महापालिकेचा वाव नव्हता, तेथे जाऊन परिसराची स्वच्छता करण्यात आली.

कचरा संकलन गाडीचे लोकार्पण भूषण गुंड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अरविंद मिसाळ, रोहित शिंदे, अक्षय शिंदे, आलोक कांबळे, सागर बोरगे, तुषार शिंदे, युवराज गावडे, ऋषिकेश ठुबे, अभि ठुबे, ओंकार क्षेत्रे, बाळा बेल्हेकर, रोशन बोरुडे यांचा समावेश होता. महिलाही मोठ्या संख्येने सहभागी होत्या. संध्या कांबळे, सविता बोरुडे, सुनीता बनकर, मंगल मिसाळ, मीना चोभे, इंदु भोजने, सविता पाटील, शांता कुटे, पूजा कांबळे, सुरेखा गावडे, शारदा लिगडे आदी उपस्थित होते.

भूषण गुंड म्हणाले की, प्रभाग १६ मधील अस्वच्छतेची परिस्थिती पाहून खूप व्यथित झालो. नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले होते. महानगरपालिका वेळेवर घंटागाड्या न पाठवल्यामुळे रस्त्यांवर कचऱ्याचे ढीग साचले होते, दुर्गंधीने जगणं मुश्कील झालं होतं. म्हणून आम्ही स्वखर्चातून कचरा उचलण्यासाठी स्वतंत्र गाडी उपलब्ध करून दिली. कचरा नाही, तर जबाबदारी उचलली जात असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हा उपक्रम फक्त एक सुरुवात आहे. केवळ कचरा साफ करून आम्ही थांबणार नाही. तर लवकरच पाणीटंचाईचा प्रश्न सोडवण्यासाठी पाण्याचे टँकर सुरू करणार आहे. केडगावमधील नागरिक महापालिकेला सर्व कर भरतात, मग त्यांना सर्व सुविधा मिळायलाच हव्यात. आपल्या भागात स्वच्छता, आरोग्य, पाणी, रस्ते या सर्व समस्यांचे समाधान करण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याचे देखील गुंड यांनी सांगितले.

# पायाभूत चाचणीअंतर्गतच्या पर्यवेक्षणासाठी अन्य शाळांवर शिक्षकांची नियुक्ती रद्द करा

नगर – समग्र शिक्षातंर्गत नियतकालिक मूल्यांकन चाचणी अंतर्गत पायाभूत चाचणीसाठी ६ ते ८ ऑगस्टदरम्यान जिल्ह्यातील शाळा–शाळांमधून अन्य शाळांवर बेकायदेशीरपणे नेमलेल्या पर्यवेक्षकांच्या नेमणुका रद्द करण्यात याव्यात व ही पायाभूत चाचणी परीक्षा फक्त वर्ग शिक्षकांनाच घेण्यात येऊ द्यावी, अशी मागणी आरपीआय (गवई गट) ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष विजय शिरसाठ यांनी जि.प.चे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे

निवेदनात म्हटले आहे की, प्रत्येक विद्यार्थ्याने इयत्तानिहाय अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही याची पडताळणी होऊन अध्ययन अध्यापन प्रक्रिया सुलभ होण्यासाठी शिक्षकांना मदत होईल. सदर चाचण्या इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षा प्रमाणे नाहीत. यामुळे विद्यार्थ्यांना याचा अतिरिक्त ताण देऊ नये. चाचण्यांचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांनी अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केलेल्या आहेत, हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप अध्ययन अध्यापन प्रक्रियेत मूलभूत सुधारणा करणे व कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे, असे स्पष्ट निर्देश आहेत . मात्र प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी घेतलेल्या ४ ऑगस्टच्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये शासननिर्णयाचे उल्लंघन करत स्वतःच्या तोंडी आदेशान्वये जिल्ह्यातील प्रत्येक शाळा शाळांमधील एक/दोन शिक्षकांना अन्य शाळांमध्ये पर्यवेक्षण करण्यासाठी बळजबरीने पाठविण्यात आले आहे. यामुळे पायाभूत चाचणी इयत्ता दहावी व बारावी बोर्ड परीक्षा प्रमाणे नाहीत हे संचालक एससीईआरटी, पुणे यांनी स्पष्ट केले असतानाही प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी जिल्ह्यातील शिक्षकांना इतर शाळांवर पर्यवेक्षण करण्यास तोंडी आदेशित केल्यामुळे शासननिर्णयाचे स्पष्टपणे उल्लंघन झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जे वर्गशिक्षक पर्यवेक्षक म्हणून अन्य शाळांवर पर्यवेक्षणासाठी जाणार आहेत त्यांच्या वर्गाची पायाभूत चाचणी योग्य रीतीने / पद्धतीने पार पडणार नाही, यामध्ये संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागणार आहे. इयत्ता दुसरी ते आठवीच्या वर्गांवर इतर शाळेतील अनोळखी/नवखे शिक्षक पर्यवेक्षणासाठी येणार असल्यामुळे व आपला वर्गशिक्षक ही परीक्षा घेणार नसल्यामुळे मुलांवर मानसिक दबाव येऊन त्यांच्यावर अतिरिक्त ताण येणार आहे, जे वर्गशिक्षक पर्यवेक्षणासाठी इतर शाळेवर कुठल्यातरी वाहनाने प्रवास करणार असून या दरम्यान काही अघटित घडल्यास या घटनेला प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनाच जबाबदार धरण्यात यावे, पायाभूत चाचणीसाठी पर्यवेक्षक शिक्षक अदलाबदली मुळे ही परीक्षा ही दडपणाखाली व योग्य वातावरणात पार पडली जाणार नाही, जिल्ह्यातील शाळेतील मुख्याध्यापकांना कुठल्याही प्रकारचे लेखी आदेश नसल्यामुळे संबंधित पर्यवेक्षक शिक्षकांना संबंधीत शाळेतून कार्यमुक्त करताना मुख्याध्यापक हे तांत्रिकदृष्ट्या अडचणीत येणार आहेत.

राहुल रेखावार, संचालक, एससीईआरटी, पुणे यांच्या ८ जुलै २०२५ च्या परिपत्रकात जिल्ह्यातील शिक्षकांना पायाभूत चाचणीच्या पर्यवेक्षणासाठी अन्य शाळांवर पाठविण्यात यावे, याबाबत कुठलेही स्पष्ट निर्देश नाहीत. तसेचही परीक्षा वर्ग शिक्षकांनी घेण्यात यावी याबाबत स्पष्ट निर्देश आहे. उलट ही परीक्षा दहावी व बारावी बोर्डाप्रमाणे नाहीत, हे त्यांनी आवर्जून स्पष्ट केलेले आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी जिल्ह्यातील शिक्षकांवर अविश्वास दाखवून शासनाच्या परिपत्रकामध्ये समाविष्ट नसणारे निर्देश हे स्वतःच्या अधिकारात दिलेले असल्यामुळे ते रद्द होऊन शाळा शाळांवर शिक्षकांना पर्यवेक्षक म्हणून नेमण्याचे दिलेले तोंडी आदेशही रद्द करावेत अशीही मागणी करण्यात आली आहे.



सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल च्या इयत्ता १० च्या विद्यार्थ्यांची क्षेत्रीय भेट 'सायबर गुन्हे शाखा' आयोजित करण्यात आली होती.

# सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या दहावीच्या विद्यार्थ्यांची 'सायबर गुन्हे शाखेला'ला क्षेत्र भेट

नगर – येथील सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल च्या इयत्ता १० च्या विद्यार्थ्यांची क्षेत्रीय भेट 'सायबर गुन्हे शाखा' आयोजित केली होती. वेबसाइट हॅकिंग, सायबर स्टॉकिंग, सायबर पोर्नोग्राफी, ई–मेल, क्रेडिट कार्ड गुन्हे, सॉफ्टवेअर पायरसी, ऑनलाइन फसवणूक आणि इंटरनेट गुन्ह्यांच्या तपासात शाखा कशी सहभागी होते, याची माहिती विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. ही शाखा माहिती तंत्रज्ञान कायदा (सुधारित २००८) तसेच आयपीसी आणि इतर कायद्यांअंतर्गत विशेषतः नोंदवलेल्या प्रकरणांची चौकशी करते. विद्यार्थी तसेच शिक्षकांसाठी हे एक विशेष माहितीपूर्ण सत्र होते. सायबर क्राइमचे मुख्याअधिकारी पेंदाम सर विद्यार्थ्यांना माहिती देण्यासाठी उपस्थित होते. त्याचबरोबर अभिजीत अरकल यांनीही विद्यार्थ्यांना पीपीटी द्वारे वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्ह्यांची माहिती दिली. हे गुन्हे आपल्या हातून होणार नाही त्यासाठी कसे सतर्क राहायला पाहिजे हेही सांगितले.

विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम आणि अभ्यासक्रमेतर ज्ञान व माहिती देण्यासाठी विद्यालयामार्फत असे उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांसमवेत संस्थेचे सचिव भागवानी सर, विद्यालयाच्या प्राचार्या गीता तांबे, वरीष्ठ शिक्षक सीमा कोटस्थाने, शिरीन शेख, अमोल धोपावकर उपस्थित होते. क्षेत्र भेटीची परवानगी दिल्याबद्दल प्राचार्यांनी व्यवस्थापन सदस्य आणि संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रुपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोदर माखिजा, विश्वस्त सुरेश हिरानंदानी, महेश मध्यान, राजकुमार गुरनानी, हरेश मध्यान यांचे आभार मानले.

# बुद्धिबळ खेळाडू इंटरनॅशनल मास्टर सुयोग वाघ याचा सत्कार

नगर – बुद्धिबळ खेळाडू सुयोग वाघ याने नुकतेच आपले इंटरनॅशनल मास्टर (आय एम) टायटल पूर्ण केल्याबद्दल त्याचा येथील गुजराथी चेस अकंडमी तर्फे सत्कार करण्यात आला. सुयोग वाघ हा अकॅडमीचा माजी विद्यार्थी असून तो अहिल्यानगर शहरातील पहिला आय एम ठरला आहे.


बुद्धिबळ खेळाडू सुयोग वाघ याने नुकतेच आपले इंटरनॅशनल मास्टर (आय एम) टायटल पूर्ण केल्याबद्दल त्याचा येथील गुजराथी चेस ॲकॅडमीतर्फे सत्कार करण्यात आला.

सुयोग याने आपल्या यशाबद्दल बोलताना कठोर परिश्रम, नियमित सराव आई आणि वडिलांचे प्रोत्साहन, तसेच प्रशिक्षक विशाल गुजराथी व प्रकाश गुजराथी यांचे वेळोवेळी मिळणारे मार्गदर्शन त्याचप्रमाणे अहिल्यानगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया, सचिव यशवंत बापट व संघटना पाठीशी उभे असल्याचे सांगितले. भविष्यात लवकरच ग्रँड मास्टर पद मिळविण्याचे ध्येय असून त्यासाठी सराव सुरू केल्याचे सांगितले. याप्रसंगी खेळाडूंना त्याने मार्गदर्शन केले व यापुढील काळात अहिल्यानगर मधून चांगले बुद्धिबळ खेळाडू घडतील असा विश्वास व्यक्त केला.

या कार्यक्रमप्रसंगी उमेश देवकर, सुयोगच्या मातोश्री डॉ. स्मिता वाघ, सौ. विनिता भागुरकर, सौ. आशा गुजराथी, हर्ष घाडगे, आयुष अय्या यासह खेळाडू आणि पालक उपस्थित होते.


दिल्लीगेट पटांगण येथे स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, बागडपट्टी व भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर दिल्लीगेट पटांगण यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर तसेच दंतरोग तपासणी शिबिर व सीबीसी व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

# आरोग्य शिबिराच्या माध्यमातून समाजसेवा घडते

## विक्रम पाठक यांचे प्रतिपादन; भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवानिमित्त विविध आरोग्य शिबिरे

नगर – दरवर्षीप्रमाणे भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव उत्साहाने साजरा करण्यात येतो. यावर्षी धार्मिक कार्यासोबतच विविध आरोग्य शिबिरे घेण्यात आली आहेत. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून समाजसेवा घडते, असे प्रतिपादन सकुळसाळी हितसंवर्धक संवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक यांनी केले आहे.

दिल्लीगेट पटांगण येथे स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळ, बागडपट्टी व भगवान श्री जिव्हेश्वर मंदिर दिल्लीगेट पटांगण यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर तसेच दंतरोग तपासणी शिबिर व सीबीसी व रक्तगट तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी स्वकुळ साळी हितसंवर्धक मंडळाचे विश्वस्त प्रमुख विक्रम पाठक, जिव्हेश्वर मंदिराचे अध्यक्ष संजय सागावकर, गजेंद्र सोनवणे, जितेंद्र लांडगे, डॉ.सुदर्शन गोरे, डॉ.आदित्य खडामकर, डॉ.कैलास खडामकर, डॉ.विकास दळवी, निलेश आदमाने, योगेश भागवत, राजेंद्र सवई, ॲड.राहुल वरुडे, मुकुंद सावेकर, संजय दळवी, कैलास दळवी, गणेश मानकर, रामप्रसाद काळे, संतोष सावेकर, अनिल सावेकर, पांडुरंग आंधळे, वनिता मानकर, अनिता सवई, कल्याणी पावले, अनिता मानकर, विद्या मानकर, सुनिता मानकर, माधुरी मानकर, मनीषा खडामकर, सुलोचना सागावकर, मीना क्षीरसागर, कल्पना कडव, मनीषा खडामकर, शितल सागावकर, सोनाली दळवी आदींसह समाज बांधव उपस्थित होते.

प्रास्ताविकात संजय सागावकर म्हणाले, भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या जन्मोत्सवानिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्याचे आयोजन करण्यात आले आहे. आपण ज्या समाजात राहतो त्या समाजाचे देणे लागतो. याप्रमाणे सर्वांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी विविध आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरास चांगला प्रतिसाद मिळाला आहे. या शिबिराच्या माध्यमातून मोफत नेत्रशस्त्रक्रिया, दंत रोग तपासणी तसेच बीबीसी व रक्त तपासणी मोफत करण्यात येणार आहे.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांनी सजवली स्नेहाची राखी

## राखी बनवा कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा सहभाग; राखींच्या मागील भाऊ-बहिणीच्या प्रेमाच्या भावना घेतल्या समजून

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी राखी बनवा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उत्साहाने सहभाग नोंदवून आपल्या कल्पकतेच्या माध्यमातून विविध प्रकारच्या आकर्षक राख्या तयार केल्या. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृतीतील रक्षा बंधनाचे महत्त्व सांगण्यात आले. या कार्यशाळेचे आयोजन शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी लंके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध रंगी दोऱ्या, मणी, झिरमिळ्या, कागद, फेटी आणि इतर कलात्मक साहित्य वापरून अत्यंत देखण्या व कल्पक राख्या तयार केल्या. केवळ सजावट नव्हे, तर त्या राखींच्या मागील भावनाही विद्यार्थ्यांनी समजून घेतल्या.


लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक शाळेत रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांसाठी राखी बनवा कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते यात सहभागी झालेले विद्यार्थी.

या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांमध्ये केवळ कलाचातुर्य वाढवण्यापुरते मर्यादित न राहता, भारतीय संस्कृतीची खरी ओळख निर्माण होते, हे शिक्षिकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. कार्यशाळेत सहभागी झालेल्या मुला–मुलींनी अत्यंत आनंदाने आपापल्या हातांनी राखी तयार करत रक्षा आणि बंध या दोन महत्त्वाच्या शब्दांचा अर्थ प्रत्यक्ष अनुभवला. या उपक्रमामुळे मुलांच्या मनात भारतीय सण, परंपरा व कुटुंबातील नात्यांची नाळ अधिक घट्ट होण्यास मदत होणार असल्याची भावना मुख्याध्यापक शिवाजी लंके यांनी व्यक्त केली.

कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षिका मिनाक्षी खोडदे, उर्मिला साळुंके, सुजाता दोमल, शितल रोहोकले, जयश्री खांदोडे, सोनाली अनभुले, रुपाली वाबळे, इंदूमती दरेकर, पुनम घाडगे, भाग्यश्री लोंढे, भारती सुसरे, कांचन मदने, विद्या बडवे यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्यांचे प्रदर्शनही भरवण्यात आले, ज्यामध्ये पालक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या कला–कौशल्याचे कौतुक केले.

# सनातन धर्म सभेतर्फे श्रावण महिन्याच्या निमित्ताने ९ ऑगस्ट रोजी श्रावणीचा कार्यक्रम

नगर – येथील सनातन धर्म सभेतर्फे श्रावण महिन्याच्या निमित्ताने श्रावणी चा कार्यक्रम ९ ऑगस्ट रोजी सकाळी ८.३० वाजता गायत्री मंदिर महाजन गल्ली येथे संस्थेचे उपाध्यक्ष घनपाठी महेश रेखे यांच्या उपस्थितीत होत आहे.

संस्थेच्या सर्व सभासद हितचिंतक पदाधिकारी यांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन सनातन धर्म सभेचे अध्यक्ष वेदमूर्ती दत्तोपंत पाठक यांनी केले आहे.

# नारळी पौर्णिमेचे महत्त्व

**प्रस्तावना :** वरुणदेवतेची कृपा आपल्यावर आणि आपल्या कुटुंबियांवर सदैव रहावी, यासाठी समुद्रकिनारी रहाणारे आणि समुद्राच्या माध्यमातून आपला चरितार्थ चालवणारे श्रावण पौर्णिमेच्या दिवशी वरुणदेवतेची पूजा करून समुद्राला नारळ अर्पण करतात. ही पूजा करण्यामागील शास्त्र या लेखातून स्पष्ट केले आहे. श्रावणी पौर्णिमेलाच नारळी पौर्णिमा असेही म्हणतात.




**नारळी पौर्णिमेचे आध्यात्मिक महत्त्व –** पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला भरती अधिक प्रमाणात येते, तर अमावास्येला ओहोटी अधिक प्रमाणात येते. श्रावण पौर्णिमेच्या दिवशी समुद्राला प्रार्थना करून फुले आणि श्रीफळ अर्पण करतात. पावसाळ्यात खवळलेला समुद्र शांत होऊन त्याने त्याची मर्यादा ओलांडू नये, अशी त्याला प्रार्थना केली जाते. समुद्र शांत झाल्यानंतरच मासेमार आणि जहाजांद्वारे समुद्री प्रवास अन् व्यापार करणारे लोक त्यांची निहित कर्मे पूर्ण करू शकतात.

सूर्याच्या उष्णतेमुळे समुद्रातील पाण्याचे बाष्पीभवन होऊन ढग तयार होतात आणि त्यामुळे पाऊस पडतो. नियमितपणे पाऊस पडण्यात सूर्यासह समुद्रदेवाचेही मोलाचे योगदान आहे. समुद्राच्या पूजनाने एक प्रकारे वरुणदेवाच्या विराट रूपाचे पूजन करून वरुणदेवाचा आशीर्वाद प्राप्त केला जातो. समुद्रदेवाचे पूजन केल्यामुळे समुद्रदेव आणि वरुणदेव यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते.

पृथ्वीवरील निसर्गाचा समतोल राखण्यासाठी नद्या आणि समुद्र यांचा मोलाचा वाटा आहे. समुद्राचे पूजन करून कृतज्ञता व्यक्त होते.

**समुद्र पूजन करायची पद्धत –** श्रावण पौर्णिमेला समुद्रकिनारी रहाणारे लोक वरुणदेवतेप्रीत्यर्थ समुद्राची पूजा करून त्याला नारळ अर्पण करतात. या दिवशी अर्पण करावयाचे नारळ हे फळ शुभसूचक आहे, तसेच ते सर्जनशक्तीचेही प्रतीक मानलेले आहे. नदीपेक्षा संगम आणि संगमापेक्षा सागर जास्त पवित्र आहे. 'सागरे सर्व तीर्थानि' असे वचन आहे. सागराची पूजा म्हणजेच वरुणदेवतेची पूजा. जहाजांनी मालाची वाहतूक करतांना वरुणदेव प्रसन्न असल्यास तो साहाय्य करतो.

**नारळी पौर्णिमच्या दिवशी करायची प्रार्थना –** नारळी पौर्णिमेच्या अगोदर समुद्राला भरती येणे, तसेच लाटांचे प्रमाण अधिक असणे, यांमुळे समुद्र खवळलेला असतो. नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्रदेवतेला नारळ अर्पण करतात. तसेच 'तुझ्या रौद्ररूपापासून आमचे रक्षण होऊ दे आणि तुझा आशीर्वाद प्राप्त होऊ दे', अशी प्रार्थनाही करतात.

**समुद्राला नारळ अर्पण कसा करावा ? –** नारळी पौर्णिमेच्या दिवशी समुद्रात नारळ अर्पण करतांना तो पाण्यात फेकतात. त्यामुळे नारळ अर्पण करण्यामागील अपेक्षित लाभ मिळत नाही; त्यामुळे तो भावपूर्ण हळुवारपणे पाण्यात सोडावा अन् वरील प्रार्थना करावी !

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ 'सण, धार्मिक उत्सव आणि व्रते. संकलन–परमेश्वर गायकवाड**

# नगर शहरात २० ते २६ ऑगस्ट या कालावधीत प्रथमच संगीतमय साई चरित्र कथेचे आयोजन

नगर – साई द्वारका सेवा ट्रस्ट, साईदास परिवार आणि अ‍ॅड. धनंजय जाधव मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने शहरात प्रथमच हभप समाधान महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून संगीतमय साई चरित्र कथेचे आयोजन करण्यात आले आहे. हे कार्यक्रम २० ते २६ ऑगस्ट या कालावधीत दररोज सायंकाळी ६ ते ९ वाजेपर्यंत बंधन लॉन, संत दासगणू नगरी येथे होणार असल्याची माहिती संयोजक अ‍ॅड. धनंजय जाधव यांनी दिली.



साई द्वारका सेवा ट्रस्ट, साईदास परिवार आणि अ‍ॅड. धनंजय जाधव मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित हभप समाधान महाराज शर्मा यांच्या संगीतमय साई चरित्र कथेच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

या कार्यक्रमाच्या प्रारंभी ध्वजपूजन सोहळा विशाल गणपती मंदिर देवस्थानचे पूजारी संगमनाथ महाराज यांच्या हस्ते पार पडला. यावेळी हभप समाधान महाराज शर्मा, पद्मश्री पोपटराव पवार, शहर पोलीस उपअधीक्षक अमोल भारती, अ‍ॅड. धनंजय जाधव, माजी उपमहापौर अनिल बोरुडे, माजी नगरसेवक निखिल वारे, तहसीलदार शिंदे, अमित महाराज धाडगे, हभप संदीप महाराज खोसे, स्वप्निल दगडे, राहुल मुथा, दिनानाथ जाधव, शिवदास पांढरे, चैतन्य जाधव, साईनाथ जाधव, अद्योजक तेजस कथडे, सिद्धार्थ मुथीयान, लांडगे विठ्ठल,अजय काळे, शंकर बोरुडे, राऊत साहेब, गर्जे, लक्ष्मीकांत तिवारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाला शुभेच्छा देताना पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, हभप समाधान महाराज शर्मा यांच्या अमृतवाणीतून सादर होणाऱ्या या संगीतमय साई चरित्र कथेच्या माध्यमातून श्री साईबाबा यांचे विचार, तत्वज्ञान आणि संपूर्ण जीवनपट समाजासमोर प्रभावीपणे सादर होणार आहे. अशा प्रकारचे धार्मिक कार्यक्रम समाजाला एकत्र आणतात. अध्यात्मिकतेमुळे मानवी जीवन अधिक आनंदमय व समरसतेने परिपूर्ण होते. अहिल्यानगरकरांनी या सोहळ्याचा लाभ घ्यावा.

धनंजय जाधव म्हणाले की, साईबाबांचे विचार आणि शिकवणी समाजात रुजवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील असतो. 'साई द्वारका सेवा ट्रस्ट' आणि 'साईदास परिवार' या माध्यमातून आम्ही वर्षभर सामाजिक, धार्मिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत असतो. या सर्व उपक्रमांचा उद्देश म्हणजे समाजात एकात्मता, सद्भावना आणि सेवा भावनेचा प्रचार व प्रसार करणे. या वर्षी प्रथमच अहिल्यानगरमध्ये ह.भ.प. समाधान महाराज शर्मा यांच्या संगीतमय अमृतवाणीतून सात दिवसांच्या साई चरित्र कथेचे आयोजन करणे हा आमच्यासाठी गौरवाचा आणि पुण्याचा भाग आहे. हा सोहळा केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, तो समाजाला दिशा देणारा एक अध्यात्मिक महोत्सव ठरेल. साईबाबांचे विचार म्हणजे श्रद्धा, सबुरी, सेवा आणि समर्पण – हे तत्वज्ञान जर प्रत्येक नागरिकाने आपल्या जीवनात अंगीकारले, तर एक सशक्त, सजग आणि समृद्ध समाज निर्माण होईल. संत दासगणू नगरीमध्ये होणारी ही संगीतमय कथा भाविकांसाठी एक अविस्मरणीय अनुभव ठरेल. कथा संपल्यानंतर दररोज महाप्रसादाचे आयोजन असून, प्रत्येक दिवशी हजारो भाविकांच्या सेवेसाठी स्वयंसेवकांची तुकडी कार्यरत राहणार आहे. या आयोजनात आमच्यासोबत काम करणारे सर्व मित्र, कार्यकर्ते, व ज्येष्ठ मार्गदर्शक यांचे मी मन:पूर्वक आभार मानतो. अहिल्यानगर शहराने नेहमीच सामाजिक कार्यांना पाठिंबा दिला आहे, आणि या पवित्र साई चरित्र कथेलाही त्याच उत्साहाने प्रतिसाद मिळेल, याची आम्हाला पूर्ण खात्री आहे.

नागरिकांनी उपस्थित राहून या सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन अ‍ॅड. जाधव यांनी केले.

# राज्यस्तरीय गणित प्रज्ञा परीक्षेत सोहम कानडे याने पटकाविले सिल्व्हर कॅटेगरी मेडल

## महाराष्ट्र राज्य व अहिल्यानगर गणित अध्यापक मंडळाच्या वतीने सन्मान

नगर – राज्यस्तरीय गणित प्रज्ञा परीक्षेत रेसिडेन्सिल हायस्कूलचा विद्यार्थी सोहम संतोष कानडे याने सिल्व्हर कॅटेगरी मेडल प्राप्त केले. महाराष्ट्र राज्य गणित अध्यापक महामंडळ व अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळ वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय गणित प्रज्ञा परीक्षा नुकतीच पार पडली.

या परीक्षेचे बक्षीस वितरण अशोकभाऊफिरोदियास्कूलच्या सभागृहात पार पडले. जनार्दन मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे मच्छिंद्र वीर, गणित अध्यापक महामंडळाचे राज्य अध्यक्ष संजय निक्रड यांच्या हस्ते सोहम कानडे याचा सिल्व्हर कॅटेगरी मेडल, प्रशस्तीपत्र, रोख बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे शिक्षण विस्तार अधिकारी अभयकुमार वाव्हळ, मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुनील पंडित, प्राचार्य उल्हास दुगड, जिल्हा गणित मंडळाचे अध्यक्ष नवनाथ घुले, माध्यमिक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे, कल्याण ठोंबरे, संतोष कानडे, सुरेखा कानडे, अर्चना चव्हाणके, अश्विनी कदम, वैशाली शेळके, पालक विद्यार्थी उपस्थित होते.



राज्यस्तरीय गणित प्रज्ञा परीक्षेत रेसिडेन्शियल हायस्कूलचा विद्यार्थी सोहम संतोष कानडे याने सिल्व्हर कॅटेगरी मेडल प्राप्त केल्याबद्दल गणित अध्यापक महामंडळाचे राज्य अध्यक्ष संजय निक्रड यांच्या हस्ते सोहम कानडे याचा सिल्व्हर कॅटेगरी मेडल देवून सत्कार करण्यात आला.

सोहमने मिळवलेल्या यशाबद्दल सेवा सोसायटीचे संचालक शिवाजी भोसले, कलाशिक्षक प्रसाद कानडे, मार्गदर्शक शिक्षक प्रकाश पाटील, योगेश मोरे, प्रमोद अमृते, प्राचार्य विजय पोकळे, अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव अ‍ॅड. विश्वासराव आठरे, सहसचिव जयंत वाघ, खजिनदार दिपलक्ष्मी म्हसे आदींनी अभिनंदन केले.

# पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळाच्या संचालकपदी सौ. जयमालाताई सोलेपाटील यांची बिनविरोध निवड

नगर – पुणे येथील पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ मर्या., गुलटेकडी, पुणे या संस्थेच्या सन २०२४–२५ ते२०२९–३० या कालावधी पंचवार्षिक संचालक मंडळ निवडणूकीत सौ. जयमाला भारत सोलेपाटील यांची सर्वसाधारण प्रतिनिधी मतदार संघातून बिनविरोध संचालक पदी निवड झाली.



बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे मिलिद टांकसाळे यांनी अधिसुचना द्वारे निर्गमीत करून जाहीर केले.

पश्चिम महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी मंडळ मर्या. गुलटेकडी, पुणे या संस्थेच्या संचालक मंडळात पुणे, सातारा, सांगली, रायगड, कोल्हापूर, धुळे, जळगांव, सोलापूर या जिल्ह्यातुन ही प्रतिनिधी म्हणून सदस्य निवडून आले आहेत. अरणगांव, (ता.जामखेड) येथील सौ. जयमाला सोलेपाटील या सहकार महर्षी स्व. गोपाळराव सोलेपाटील यांच्या स्नूषा असून त्या अहिल्यानगर डिस्ट्रिक्ट को–ऑपरेटिव्ह बोर्डाच्या गेली वीस वर्षापासून संचालक असून सध्या विद्यामान चेअरमन म्हणून काम पाहात आहेत. अरणगांव येथील सहकार महर्षी गोपाळरावजी सोलेपाटील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे संचालक आहेत.



निलेशभाई नलावडे भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष व आमदार महेश शिंदे यांचे निकटवर्तीय निलेशभाई नलावडे यांचे अहिल्यानगरवासीयांच्या वतीने आंतरराष्ट्रीय मानवाधिकार न्याईक सुरक्षा परिषदेचे जिल्हाध्यक्ष अमोल कोठारी यांनी स्वागत करून सत्कार केला. यावेळी इंजि. मयूर फलके, इंटिरियल नितीन सुराणा, सागर गोरे, उद्योजक महेश ठुबे, मयूर आदी. (छाया – बबलू शेख)

# माळीवाडा परिसरातून १८ वर्षीय तरुणी बेपत्ता

नगर – शहरातील माळीवाडा परिसरातील पटवेकर गल्ली येथून एक १८ वर्षीय तरुणी घरातून कोणाला काही न सांगता अचानक बेपत्ता झाल्याची घटना २ ऑगस्ट रोजी सकाळी घडली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली असून, पोलीस त्या तरुणीचा शोध घेत आहेत. सदर तरुणी २ ऑगस्ट रोजी सकाळी ७ ते ७.३० वाजेदरम्यान घरातून निघून गेली असल्याचे तिच्या आईने कोतवाली पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हंटले आहे. या तक्रारीवरुन मिसिंगची नोंद करण्यात आली आहे.

# मोह–माया बंधनातून मुक्त होण्यासाठी गीता ऐकायची असते

## स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांचे प्रतिपादन; सावेडीत भगवत गीता ज्ञानयज्ञ

नगर – जन्माचे मूळ शोधले की आपल्याला माया ही माता आहे हे समजते या माते पासून सृष्टी निर्माण झाली असली तरी ८४ लक्ष योनी भगवंतापासून निर्माण झाले आहेत. कारणे सापडले की उपाय सापडतो त्याप्रमाणे बंधनाची कारणे शोधले की त्या बंधनातून आपण सुटू शकतो मोह, माया या मध्ये आपण बांधलो आहोत या बंधनातून मुक्त होण्यासाठी गीता ही ऐकायची असते, असे विवेचन नांदेड येथील स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी केले.

चिन्मय मिशन अहिल्यानगर द्वारा आयोजित श्रीमद् भगवत गीता ज्ञानयज्ञ अध्याय १४ वा चे विवेचन नांदेड येथील स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी सावेडी येथील पाईपलाईन रोडवरील श्रीकृष्णनगर मध्ये विठ्ठल रुक्मिणी मंदिरात सांगण्यास प्रारंभ केला. याप्रसंगी नगर चिन्मय मिशन शाखेचे अध्यक्ष अ‍ॅड. धोंडीराम घोरपडे, खजिनदार देवराम मोरे, कोषाध्यक्ष उत्तम साळुंखे, शिवाजी ढोले, रामचंद्र शिर्के, खंडेराव मगर, हभप विद्याताई हारदे उपस्थित होते.



चिन्मय मिशन अहिल्यानगर यांच्या वतीने सावेडीत श्रीमद् भगवत गीता ज्ञान यज्ञ सुरू झाले. स्वामी प्रत्ययानंद सरस्वती प्रवचन करताना. यावेळी भाविक उपस्थित होते (छाया – विजय मते)

श्रावण मासानिमित्त सुरू असलेल्या या कार्यक्रमास भाविक उपस्थित असतात. स्वामी प्रत्ययानंद सरस्वती यांनी अध्याय चौदावा मध्ये असलेल्या सत्वगुण, रजोगुण, तमोगुण यांचे सविस्तरपणे विवेचन केले. भगवत गीता मध्ये या तीन गुणांचे वर्णन फारच सुंदर केले आहे. सकाळी सत्वगुण, दिवसभर रजोगुण व रात्री तमोगुण स्वीकार करा जास्तीत जास्त सत्वगुणांमध्ये राहा असे सांगितले तसेच या गीता प्रवचनाचा लाभ सर्वांनी घ्यावा असे आवाहन त्यांनी केले.

सात दिवस सुरू असलेल्या या अध्याय प्रवचना मध्ये त्यांनी बंधने माणसावर कसे बांधतात हे कळले तर त्या बंधनातून आपण सुटू शकतो मोह, मायाने आपण बांधलो आहोत पक्षी ज्याप्रमाणे राहतात त्याप्रमाणे आपली अवस्था असते. पोपट हा पिंजरा शोधतो त्याप्रमाणे जे लोक घराबाहेर पडू शकत नाहीत ते तुरुंगात असल्यासारखे असतात. काही लोक कबुतरा सारखे असतात कबुतराला आपण निसर्गात मुक्त करतो पण ते कबूतर परत घरी येतात तर काही लोक गरुडासारखे झेप घेतात ते परत येत नाहीत असे ते साधुसंत असतात ते कधीच बंधनात अडकत नाहीत. या बंधनातून मुक्त होण्यासाठी गीता ही ऐकायची असते असे त्यांनी स्पष्ट केले. या सप्ताहात दररोज सकाळी साडेसात ते साडेआठ कठोपनिषदा मध्ये नचिकेत व यमधर्माचे संवाद रूपाने आत्मस्वरूप विशद केले. आत्मा कसा आहे? मेल्यानंतर जीव कुठे जातो? याचे सुंदर विवेचन स्वामींनी सांगितले.

### काँग्रेस–राष्ट्रवादीने काँग्रेसने मतांसाठीच

# मराठा समाजाचा वापर करून आरक्षणापासून वंचित ठेवले

## नरेंद्र पाटील यांचे वक्तव्य; भाजपाच्या प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ता संवाद मेळावा

नगर – काँग्रेस–राष्ट्रवादी काँग्रेसने २०१४ पर्यंत केवळ एकगठ्ठा मतांसाठीच मराठा समाजाचा वापर केला मात्र आरक्षण दिले नाही; ही शोकांतिका. मात्र मुख्यमंत्रीपदी देवेंद्र फडणवीस वीरजमान झाल्यानंतर अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास महामंडळाची पुनर्रचना केली. कोट्यावधी रुपयांचा निधीही उपलब्ध करून दिला. देवेंद्र फडणवीस प्रत्येक समाजाला न्याय देत आहेत. त्यांनी मराठा समाजाला आरक्षणासह भरभरून दिले आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीच्या सर्व मराठा पदाधिकाऱ्यांनी देवेंद्र फडणवीस जरी ब्राह्मण समाजाचे असले तरी त्यांच्यामुळेच राज्यातील मराठा समाजाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला आहे हे ठामपणे सर्वांना सांगावे. आजपर्यंत मराठा समाजाच्या आरक्षणावरून वर्षानुवर्षे राजकारण केले गेले, पण समाजाला आरक्षण देणारे ते एकमेव नेते आहेत, असे प्रतिपादन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी केले.




जिल्हा भाजपाच्या संवाद मेळाव्यात मार्गदर्शन करताना अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील. समवेत शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग.

भारतीय जनता पार्टी अहिल्यानगर शहर व दक्षिण जिल्ह्यातील मंडल अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मार्गदर्शन करताना नरेंद्र पाटील बोलत होते. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, जिल्हा सरचिटणीस मनोज कुलकर्णी, युवराज पोटे, विवेक नाईक, विचार भारतीचे सुधीर लांडगे, बाळासाहेब महाडिक, महिला आघाडीच्या अध्यक्ष प्रिया जानवे, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, सोमनाथ पाचारणे, सुनील थोरात, शुभांगी सप्रे, विद्या शिंदे आदींसह शहरातील व जिल्ह्यातील सर्व मंडल अध्यक्ष व पदाधिकारी उपस्थित होते.

नरेंद्र पाटील पुढे म्हणाले, राज्यात २०१६ साली नगरमध्ये कोपर्डीची घटना घडल्यानंतर राज्यातील मराठा समाज एकत्र आला. त्यावेळी जे राज्यभर महामोर्चे निघाले त्यास काका पुतण्यांनी राजकारण करत खतपाणी घातले. मात्र मुख्यमंत्री फडणवीस यांनी अतिशय संयमाने ही पेटलेली परिस्थिती हाताळली व योग्य निर्णय घेत मराठा समाजाचे अनेक प्रश्न मार्गी लावण्यास काम सुरू केले. देवेंद्र फडणवीस यांनी कधीही जातीपातीचे राजकारण केले नाही. राज्यातील १२ बलुतेदार व १८ पगड जातींना बरोबर घेत राज्याचा विकास करणारा हा खरा जाणता राजा आहे. भाजपच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी अण्णासाहेब पाटील महामंडळाचे कार्य व योजना प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. ज्यांना गरज आहे त्यांना आर्थिक सहकार्य मिळवू देत पायावर उभे करा.

अनिल मोहिते म्हणाले, मराठा समाजाच्या आरक्षणासाठी बलिदान देणारे अण्णासाहेब पाटील हे पहिले कुटुंबीय आहेत. त्यांच्या नावाने स्थापन झालेल्या या महामंडळाला कॅबिनेट मंत्री पदाचा दर्जा देऊन देवेंद्र फडणवीस यांनी मोठी चालना दिली आहे. नगरमध्ये पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांच्या मार्गदर्शनाखाली या महामंडळाची चांगली अंमलबजावणी होत असून जिल्ह्यामध्ये १८ हजार लाभार्थ्यांना या महामंडळाच्या माध्यमातून लाभ झाला आहे. देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच तब्बल ३०० कोटी रुपयांचा भरीव निधी या महामंडळाला दिला आहे. त्यामुळे महामंडळाकडे निधीची कमतरता नाही. अहिल्यानगर जिल्ह्यातील लाभार्थ्यांचा भव्य मेळावा लवकरच विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे, पालकमंत्री राधाकृष्ण विखे, सुजय विखे यांच्या मार्गदर्शनाखाली व नरेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करणार आहोत.

प्रस्ताविकात जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग म्हणाले, या महामंडळाचा मराठा समाजाला व बांधवांना फार मोठा आधार आहे. महामंडळाची पुनर्रचना करून देवेंद्र फडणवीस यांनी समाजाला खरा न्याय दिला आहे. नरेंद्र पाटील हे अत्यंत तळमळीने मराठा समाजाकरता पूर्ण राज्यात काम करत आहेत. त्यांना सर्वांनी साथ द्यावी, असे आवाहन केले.



**कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अहिल्यानगर शहरात स्वतंत्र कार्यालय सुरु करावे**

कै. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अहिल्यानगर शहरात स्वतंत्र कार्यालय करण्यात यावे, अशी मागणी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा व केडगाव मंडल यांच्या वतीने महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांना करण्यात आली. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, केडगाव मंडल अध्यक्ष भरत ठुबे, युवा मोर्चा उपाध्यक्ष अजित कोतकर, शुभम लोंढे, सौरभ सुनसळे, महेश कलशेट्टी, सौरभ आजबे आदी उपस्थित होते.

# गणराज प्रकाशनच्या 'ओंजळीतले सुख' या काव्यसंग्रहाचे १० ऑगस्ट रोजी प्रकाशन

## पोपटराव गवळी लिखित समाजातील विविध घटक व पैलूंचे वेद घेणारे हृदयस्पर्शी काव्यसंग्रह

नगर – गणराज प्रकाशन प्रकाशित आणि पोपटराव गवळी लिखित ओंजळीतले सुख या काव्यसंग्रहाचे १० ऑगस्ट रोजी ज्येष्ठ साहित्यिक डॉ. संजय कळमकर यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे. छत्रपती संभाजीनगर रोड येथील डीएसपी चौक येथील हॉटेल पंचवटीका येथे हा प्रकाशन सोहळा म.सा.प.चे (पुणे) केंद्रीय सदस्य चंद्रकांत पालवे यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक माजी आमदार लहू कानडे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. संदीप सांगळे, कवियत्री तथा साहित्यिका प्रतिभा खैरनार, नेत्रदूत जालिंदर बोरुडे उपस्थित राहणार असल्याची माहिती गणराज प्रकाशन प्रा. गणेश भगत यांनी दिली.




ओंजळीतले सुख या काव्य संग्रहात लेखक पोपटराव गवळी यांनी सामाजिक, कौटुंबिक, प्रेम आणि ग्रामीण भागातील भावना आपल्या काव्यातून शब्दबध्द केले आहे. या सोहळ्यासाठी साहित्य प्रेमी व कवींना यांना उपस्थित राहण्याचे आवाहन इंजि. गणेश गवळी, डॉ. अबोली निकम, इंजि. राजहंस देसाई, इंजि. गौरी शिंदे यांनी केले आहे.

# नांगरून ठेवलेल्या रस्त्यांच्या खड्ड्यातच सण साजरे करायचे का? शहरातील 'बाजारपेठा ओसाड', गोकुळाष्टमीपूर्वी 'रस्ते पॅचिंग करा'

नगर – नांगरून ठेवलेल्या शेताप्रमाणे शहरातील रस्ते खड्डेमय झाले आहेत. शहरातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था असून सणासुदीच्या पार्श्वभूमीवरही महापालिकेचे दुर्लक्ष सुरूच असल्याचा आरोप आणि या खड्ड्यांमध्येच आम्ही सण साजरे करायचे का? असा सवाल काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी केला आहे.

यासंदर्भात त्यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांना पत्राद्वारे रस्त्यांचे पॅचिंग करण्याची तातडीची मागणी केली आहे. गोकुळाष्टमीचा सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपलेला असताना नगर शहरातील अनेक रस्ते उखडले गेले असून, त्यामुळे बाजारपेठा ओस पडल्या आहेत. याच रस्त्यावरून मेहतर समाजाची पवित्र काठी मिरवणूक तसेच गोकुळाष्टमीची पारंपरिक मिरवणूक निघते. मात्र सध्या रस्त्यांची अवस्था नांगरून ठेवलेल्या शेताप्रमाणे झाली आहे. शहरात रस्त्यांवर दीडशे कोटी रुपयांचा खर्च करण्यात आल्याचा गाजावाजा करण्यात आला, तरी प्रत्यक्षात सर्वच कामे अर्धवट टाकण्यात आली असून निधी नसल्याचे कारण पुढे करून कामे थांबवली गेल्याचा आरोपही चव्हाण यांनी केला. विधानसभा निवडणूक मात्र व्यवस्थित पार पाडण्यासाठी याद्वारे साधनसंपत्ती उभी केली गेली होती का? मग आता रस्त्यांसाठी निधी का नाही, ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

## पालिकेत प्रशासकाचे राज्य असले तरी लोकप्रतिनिधीनी काहीच बोलायचं नाही का?

साहेब, पालिकेत प्रशासकाचे राज्य सुरू झाल्यापासून तीन वर्षात कोणत्या सणाला रस्त्यांना पॅचिंग झालेलेच नाही. आता तर रस्त्याची अवस्था खूप बिकट आहे. आम्ही आपल्याकडे नवीन रस्त्याची नाहीतर फक्त पॅचिंग ची मागणी करत आहोत. शहरवासीय सणासुदीचे क्षण खड्ड्यांमधून वाट काढत साजरे करत आहेत. गोकुळाष्टमी, बैलपोळा, गणपती असे सण या खड्ड्यात उभे राहून साजरे करायचे का? याचा कोणीही विचार करत नाही ही मोठी शोकांतिका आहे, अशी खंत चव्हाण यांनी व्यक्त केली. पालिकेतील पात्र कामगारांना सण साजरा करण्यासाठी ॲडव्हान्स मिळावा अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. आणि किमान गोकुळाष्टमी साठी रस्ते पॅकिंग करून द्यावेत अशी मागणी त्यांनी केली आहे.

# जमिनीवरील मालकी हक्कासाठी १३ ऑगस्टला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण

नगर – १९६१ पासून ताब्यात असलेल्या शासकीय जमिनीवर मालकी हक्क देण्यासाठी एकलव्य भिल्ल सेनेचा व तंट्यातात्या भिल्ल क्रांती फोर्सच्या वतीने १३ ऑगस्ट रोजी सकाळी ११.३० वाजता जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येणार आहे.

नेवासा तालुक्यातील फॉरेस्ट जमिनीवर स्व. काळू गणपत सुरसे सूर्यवंशी यांच्या वंशजांनी १९६१ पासून शांततामयपणे शेती करत उपजीविका साधली आहे. या जमिनीवर पाण्याची सुविधा करून बागायती पिके घेतली जात असून, कुटुंबाच्या उपजीविकेचे एकमेव साधन हीच जमीन आहे.

लिमिटेशन ॲक्ट १९६३ मधील कलम २७ व संविधानातील आर्टिकल ६५ नुसार, या जमिनीवरील अतिक्रमण ४९ वर्षांपेक्षा अधिक काळ टिकून राहिल्याने त्यावर मालकी हक्काची नोंद व्हावी अशी मागणी संघटनांनी केली आहे. शिवाय, दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ च्या कलम १५१ नुसार स्थानिक चौकशी होऊन हक्क स्पष्ट करावा व कोणत्याही पोलिस कारवाईपूर्वी चौकशी पूर्ण झाल्याशिवाय गुन्हा दाखल करू नये, अशी अट घालण्यात यावी, अशीही मागणी करण्यात आली असून यासंदर्भात जिल्हा प्रशासनाला वेळोवेळी निवेदने देऊन मागणी करण्यात आली असून अद्यापही न्याय न मिळाल्यामुळे अखेर उपोषणाचा मार्ग स्वीकारण्यात येत आहे. या उपोषणाचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. यावेळी एकलव्य भिल्ल सेनेचे अध्यक्ष ज्ञानेश्वर आहिरे, तंट्यातात्या भिल्ल क्रांती फोर्सचे अध्यक्ष संपतराव मोरे, सुधाकर सुरसे, अविनाश सूर्यवंशी, मीराबाई सूर्यवंशी, विमलताई सूर्यवंशी, नर्मदाबाई सूर्यवंशी, पद्माबाई बर्डे, मिराबाई मोरे, बाळू मोरे आदी उपस्थित होते.

# २०२१ च्या पोलीस भरतीतील उमेदवारांची पुन्हा वैद्यकीय तपासणी जे.जे. रुग्णालयात घेण्यात यावी

## अन्यथा १५ ऑगस्टला राजभवनासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा

नगर – २०२१ पासून जिल्हा रुग्णालयात पात्र ठरवलेल्या पोलीस भरतीतील उमेदवारांची पुन्हा वैद्यकीय तपासणी मुंबई येथील जे.जे. रुग्णालयात घेण्यात यावी, अशी मागणी भिंगार येथील वाल्मिकी सोसायटीमधील सुलोचना गणपत केदारे यांनी निवेदनात केली आहे.

सुलोचना केदारे यांच्या सुनबाई कल्पना विठ्ठल केदारे या पोलीस सेवेतून २०२१ मध्ये सेवानिवृत्त झाल्या. त्याच वर्षी कोरोना काळात त्यांचे चिरंजीव कै. विठ्ठल गणपत केदारे यांचे निधन झाले. विठ्ठल केदारे हे पोलीस दलात आचारी पदावर कार्यरत होते. त्यानंतर त्यांच्या लहान नातवाला – विक्रम केदारे याला अनुकंपा तत्वावर नोकरी मिळावी, यासाठी प्रयत्न करण्यात आले. मात्र, पोलीस आस्थापना विभागातील एका कर्मचाऱ्याला पैसे न दिल्यामुळे, विक्रम याची नियुक्ती टाळण्यात येत असल्याचा आरोप सुलोचना केदारे यांनी केला आहे. २०२३ मध्ये त्यांनी आंदोलन केल्यानंतर विक्रमला वैद्यकीय तपासणीसाठी पाठवण्यात आले. परंतु, जिल्हा रुग्णालयातील एकाने तपासणीसाठी अधिक पैशांची मागणी केली, पैसे न दिल्यामुळे तपासणी अर्धवट राहिली आणि त्याचा नकारात्मक परिणाम विक्रमच्या शासकीय सेवेच्या संधीवर झाला, असे केदारे यांनी म्हटले आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे त्रस्त होऊन, त्यांनी पोलीस महासंचालक व पोलीस अधीक्षक कार्यालयात अनेक वेळा निवेदने दिली.

विक्रम याची पुन्हा वैद्यकीय तपासणी जे.जे. रुग्णालयात घेण्यात आली नाही, तर १५ ऑगस्ट पासून मुंबई येथील राजभवनासमोर आमरण उपोषणाला बसेन, असा इशारा सुलोचना केदारे यांनी दिला आहे. तसेच, २०२१ पासून जिल्हा रुग्णालयात तपासणी झालेल्या सर्व पोलीस भरती उमेदवारांची पुन्हा तपासणीही जे.जे. हॉस्पिटलमध्येच व्हावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

# अरिहंत कॉलेज ऑफ बी फार्मसीचा उत्कृष्ट निकाल

नगर – अरिहंत कॉलेज ऑफ फार्मसीने यावर्षी उत्कृष्ट निकालांची परंपरा जपत ९७ टक्के निकालाची नोंद केली आहे. यामध्ये प्रथम वर्ष बी फार्मसी प्रथम क्रमांक– कर्डिले मयुरी ८.५२, द्वितीय क्रमांक –आढाव श्रुतिका ८.४१, तृतीय क्रमांक – सोनवणे वैष्णवी व तावरे मोनिका ८.३७.

चतुर्थ वर्ष बी फार्मसी प्रथम क्रमांक– वालेकर संकेत, दळवी गायत्री, तावरे श्वेता ८.७३, द्वितीय क्रमांक –चौगुले अभिषेक, झुटे दिव्या, घोलप वैष्णवी, मगर नम्रता, भोर दिव्या ८.५५., तृतीय क्रमांक – बाफना तनवी, कलागते सुदर्शन, गोरे दिव्या, पडोळे प्रगती, बरकडे भारत, विधाते साक्षी, थोरात भागेश,मोमीन मुजुमिन ८.३६.

विद्यार्थ्यांच्या यशामागे प्राचार्य डॉ. योगेश बाफना व उपप्राचार्य वर्षाराणी आव्हाड यांचे योगदान लाभले. तसेच प्रा. जितेश बत्रा, प्रा.पियुष जंगम, प्रा. कांचन गलगटे, प्रा.राधवान भाग्यश्री, प्रा.अश्विनी गुंजाळ, प्रा.तृप्ती शिंदे, प्रा.स्नेहा कणसे, प्रा.सुधीर गर्जे, प्रा. मिलिंद शिरसागर, प्रा. नीता येणारे आणि अमोल बर्डे, अनिल गावडे, बाळासाहेब भागवत, योगेश पंडित यांचे मार्गदर्शन लाभले.





केडगाव मधील पाणीटंचाई व कचऱ्याच्या समस्या विरोधात मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते महेश सरोदे. शेजारील छायाचित्रात केडगाव मधील पाणीटंचाई व कचऱ्याच्या समस्येविरोधात महिलांनी महापालिकेवर हंडा मोर्चा नेला होता. (छाया – राजू खरपुडे)

# महिलांचा महानगरपालिकेमध्ये हंडा मोर्चा; पाणीटंचाई आणि कचरा समस्येवर आक्रोश

नगर – उपनगरीय भागातील नागरिकांनी अखेर महापालिकेवर हंडा मोर्चा काढत आपला संताप व्यक्त केला. गेल्या अनेक दिवसांपासून परिसरात सातत्याने पाणीटंचाई आणि अनियमित कचरा संकलनामुळे नागरिक त्रस्त झाले असून, यासंदर्भात प्रशासनाला यापूर्वी निवेदन देऊनही कोणतीही ठोस कारवाई झाली नव्हती. त्यामुळे महिलांनी हातात पाणीभांडी घेऊन थेट पालिकेवर मोर्चा नेला. या वेळी महापालिकेच्या प्रवेशद्वारावर महिलांनी ठिय्या देत घोषणाबाजी केली. पाणी आमचा हक्क आहे, महापालिका झोपलीये, कचऱ्याचा नाय नाय! अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता. आंदोलनाला प्रतिसाद मिळाला आणि महिलांचा सहभाग विशेषत्वाने लक्षणीय होता.

या आंदोलनाचे नेतृत्व महेश सरोदे आणि श्री गुरुदेव दत्त सेवा ट्रस्टने केले. सरोदे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या केडगाव प्रभाग क्रमांक १७ मधील उपनगरीय भागातील नागरिकांनी महिनोंमहिने सहन करून आम्ही शांततेच्या मार्गाने निवेदन दिलं, वेळ दिला, पण प्रशासनाने केवळ आश्वासनं देण्यापलीकडे काहीच केलं नाही. आम्हाला सहा ते आठ दिवसांनी पाणी मिळतं आणि तेही इतक्या कमी दाबाने की पाण्याचा उपयोग होण्याआधीच तो संपतो. दुसरीकडे कचरा संकलनाची स्थिती अजून बिकट आहे. १०–१५ दिवसांनी कचरागाडी येते आणि रस्त्यावर कुजणाऱ्या कचऱ्यामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे. आमचं घरं शुद्ध ठेवायचं, मुलांना रोगराईपासून वाचवायचं, पण प्रशासन काहीही करत नाही. यामुळेच आम्ही आज महिलांसह रस्त्यावर उतरलो आहोत.

ते पुढे म्हणाले, महापालिकेचे अधिकारी एसी ऑफिसमध्ये बसून निर्णय घेतात, पण आम्हाला रोज सकाळी एक एक थेंब पाण्यासाठी धावपळ करावी लागते. स्वच्छता मोहिमा फक्त कागदावर चालतात, प्रत्यक्षात गल्लीबोळांत दुर्गंधी आणि साचलेला कचरा यामुळे जीवन असह्य झाले आहे. आमच्या मुलांचं आरोग्य धोक्यात आलं आहे. जर प्रशासनाला नागरिकांच्या समस्या खरंच महत्वाच्या वाटत असतील, तर त्यांनी तात्काळ कृती करावी. आम्ही आंदोलन करण्याची हौस ठेवलेली नाही, पण न्यायासाठी लढा द्यावा लागतोय. अजूनही वेळ गेलेली नाही, प्रशासनाने जागे होऊन पाणी व कचऱ्याच्या समस्येवर ठोस पावले उचलावी.

मोर्चा सुरु असताना पालिकेच्या प्रतिनिधींनी आंदोलकांशी चर्चा केली. यावेळी पालिकेच्या वतीने सांगण्यात आले की, कचरा संकलनाचे टेंडर अद्याप प्रक्रियेत असल्याने त्यात थोडा वेळ लागणार आहे. मात्र, पाणीपुरवठ्याची समस्या तात्काळ सोडवली जाईल, असा शब्द देण्यात आला. मात्र आंदोलक नागरिकांनी फक्त आश्वासन नव्हे, तर कृती हवी असल्याचा ठाम पवित्रा घेतला.

यावेळी अनिता दाते, सोनाली बोरुडे, सविता हुलगे, आरती सरोदे, अलका कोतकर, सीमा हुलगे यांसह अनेक महिला उपस्थित होत्या.

# महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन नोंदणी करा

नगर – इतर मागासवर्गीय समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ तसेच त्याअंतर्गत कार्यरत १३ उपकंपन्यांची स्थापना शासनाने केली असून, जिल्हास्तरावर अहिल्यानगर येथे त्यांचे कामकाज सुरू करण्यात आले आहे. महामंडळाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी पात्र लाभार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी करावी, असे आवाहन महामंडळाचे व्यवस्थापकांनी केले आहे.

महामंडळामार्फत सहा योजना राबविल्या जात असून त्यामध्ये वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना, गट कर्ज व्याज परतावा योजना, शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना व महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना या पूर्णतः ऑनलाईन स्वरूपाच्या आहेत. या योजनांसाठी पात्र अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रांसह www. msobcfdc.org या वेब पोर्टलवर अर्ज करणे अनिवार्य आहे.

बीजभांडवल योजना व बीज कर्ज योजना या ऑफलाईन स्वरूपाच्या असून, त्यांचे अर्ज जिल्हा कार्यालयात उपलब्ध आहेत.

यासंदर्भात अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, दूरध्वनी – ०२४१–२४५००३० या ठिकाणी संपर्क साधावा.



यशवंत गाडे विद्यालयात गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप प्रसंगी उपस्थित ज्ञानदेव पांडुळे, पोलिस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, उद्योजक समीर शेख आदी.

# यशवंत गाडे विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

नगर – मुकुंदनगर (फकिरवाडा)येथील यशवंत गाडे माध्यमिक विद्यालयातील गरजू विद्यार्थ्यांना शालेय गणवेश, पाठ्यपुस्तके, दप्तर, वह्या व इतर शालेय साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. मुकुंदनगर येथील युवा उद्योजक व समीर शेख यांच्या पुढाकारातुन हा कार्यक्रम पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे विश्वस्त ज्ञानदेव पांडुळे होते, तर यावेळी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र इंगळे, तसेच उद्योजक समीर शेख, पालक, जेष्ठ नागरिक मंचचे सदस्य उपस्थित होते. मुख्याध्यापिका संगीता बनकर यांनी सर्वांचे स्वागत केले.

ज्ञानदेव पांडुळे यांनी सांगितले की, विद्यालयाचे ध्येय हे गरजू विद्यार्थ्यांना शक्य त्या सर्व प्रकारे शिक्षणात मदत करणे आहे. समीर शेख यांचा हा उपक्रम समाजाला दिशा देणारा ठरेल. प्रास्तावीक मनिषा मगर यांनी तर सुत्रसंचालन आदिनाथ लवांडे यांनी केले. योगेश गुंड यांनी आभार मानले.

# महानगरपालिकेने सुविधा द्याव्यात अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडणार



कुंडलिक गदादे पाटील

नगर – रस्त्यावरील खड्डे, मोडकळीस आलेल्या सार्वजनिक सुविधा, पावसाळ्यात निर्माण होणारी दलदल, कचरा व्यवस्थापनातील त्रुटी, व्यायाम व खेळण्यासाठी आवश्यक सुविधा नसणे आदी प्रश्नांवर भाजप ओबीसी शहर जिल्हा उपाध्यक्ष कुंडलिक गदादे पाटील यांनी महानगरपालिका आयुक्तांकडे निवेदन सादर केले.

निवेदनात त्यांनी नमूद केले की प्रभाग क्रमांक १५ मधील आयकॉन पब्लिक स्कूलपासून ते विरगुळ मैदानापर्यंत रस्त्यावर खड्डे पडले असून, लहान मुलांसह नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. सागर कॉम्प्लेक्स व लाईन क्र. ६ मधील रस्ते मोडले असून, तेथे पाणी साचते, दलदल होते. या रस्त्यांचे डांबरीकरण किंवा सिमेंट काँक्रीटीकरण करावे, तसेच पाणी निचऱ्यासाठी मोठा पाईप बसवावा. रेल्वे भिंतीलगत अर्धवट रस्ता पूर्ण करावा, लोखंडी पुलाजवळ रस्त्यांची डागडुजी करावी, सुमती कॉलनी व पित्रोडा ते लाहोटी बंगल्यापर्यंतचे रस्ते सीसी करावेत. पंडित दीनदयाळ उपाध्याय भवन जुने झाले असून, त्याचे नुतनीकरण आवश्यक आहे. विरगुळ मैदानातील खेळ व व्यायाम साहित्य खराब झाले असून, नवीन साहित्य त्वरित बसवावे. मैदानावरील फलकही दुरुस्त करावा. तसेच प्रभागातील ओपन स्पेसमध्ये व्यायामशाळा सुरू करण्यात यावी आणि घंटागाडीची सेवा नियमित करावी, अशा मागण्या त्यांनी या निवेदनाद्वारे मांडल्या.

नागरिकांनी अनेक वेळा तक्रारी करूनही प्रशासन गांभीर्याने दखल घेत नाही. आता ही सहनशीलता संपली असून, जर तातडीने या मागण्या मान्य झाल्या नाहीत, तर आम्ही जनतेला घेऊन रस्त्यावर उतरणार आहोत. ही लढाई केवळ विकासासाठी नाही, तर नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि मूलभूत सुविधांसाठी आहे. प्रशासनाने वेळेत कारवाई करावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडले जाईल.







अहमदनगर महाविद्यालयात नुकतीच नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस, सचिव विशाल बार्नबस, प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे, रजिस्टार कल्पलता भिंगारदिवे आदी.

# अहमदनगर महाविद्यालयात इयत्ता ११ वीच्या विद्यार्थी व पालकांचा स्वागत समारंभ उत्साहात

नगर – अहिल्यानगर शहरामध्ये ७५ वर्षाहून अधिक काळापासून शिक्षण देत असलेल्या बी.पी.एच.ई. सोसायटीच्या अहमदनगर महाविद्यालयात नुकतीच नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र राज्याने प्रथमच इयत्ता ११ वी साठीची प्रवेश प्रक्रिया केंद्रीय ऑनलाईन प्रक्रियेने राबवली आणि प्रदीर्घ तसेच काहीशा किचकट व परंतु विद्यार्थ्यांच्या उपयोगाची अशा प्रवेश प्रक्रियेला सामोरे जाऊन विद्यार्थ्यांना ११ वी प्रवेश मिळाला त्यामुळे विद्यार्थी आणि पालकांचे विशेष स्वागत आणि अभिनंदन करण्यासाठी हा समारंभ आयोजित करण्यात आला. हा समारंभ कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्रांगणात पार पडला. त्याला विद्यार्थी, पालक व शिक्षकवर्ग उपस्थित होता.

समारंभाची सुरुवात सुमधुर स्वागत गीताने करण्यात आली. या प्रसंगी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बार्नबस, सचिव विशाल बार्णबस, प्रभारी प्राचार्य डॉ. नोएल पारगे, रजिस्टार कल्पलता भिंगारदिवे उपस्थित होते.

कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रतुल कसोटे यांनी स्वागत करत महाविद्यालयाच्या आजवरच्या उल्लेखनीय वाटचालीचा थोडक्यात मागोवा घेत उपस्थित सर्व पदाधिकाऱ्यांची ओळख करून दिली.

या प्रसंगी संस्थेचे सचिव यांनी महाविद्यालयाच्या शैक्षणिक परंपरा, शिस्त आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेल्या संधी यावर प्रकाश टाकला आणि भविष्यातील विविध नव्या महाविद्यालय उपलब्ध करून देत असलेल्या प्रकल्प आणि योजनांची माहिती दिली.

या कार्यक्रमात शिक्षकांनी विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला. पालकांनाही संवाद साधण्याची संधी देण्यात आली. त्यांनी महाविद्यालयाच्या उपक्रमशीलतेचे व व्यवस्थापनाचे कौतुक केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मार्शनील स्वामी आणि प्रा. वर्षा पटेकर यांनी केले. आभारप्रदर्शन प्रा. सुलक्षणा गायकवाड यांनी केले.

## नागरिकांनी राष्ट्रध्वजाचा सन्मान राखण्याचे आवाहन

नगर – प्रजासत्ताक दिन, स्वातंत्र्य दिन, इतर राष्ट्रीय कार्यक्रम व विशेष प्रसंगी राष्ट्रध्वजाचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जातो. नागरिकांनी राष्ट्रध्वजाचा सन्मान राखावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

विविध प्रसंगी राष्ट्रध्वजाचा वैयक्तिक वापर होत असतो. मात्र, कार्यक्रमानंतर काही ठिकाणी राष्ट्रध्वज जागोजागी पडलेले दिसतात, जे अत्यंत दुर्दैवी व अवमानकारक आहे. अशा प्रकारे राष्ट्रध्वजाची अवहेलना होऊ नये, यासाठी सर्वांनी दक्ष राहावे.

ध्वजसंहितेतील सर्व नियम व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे अत्यावश्यक आहे. खराब किंवा माती लागलेले राष्ट्रध्वज गोणी किंवा कपड्यात व्यवस्थित बांधून, शिवून बंद करावेत. अशासकीय संस्था, संघटना व नागरिकांनी अशा राष्ट्रध्वज तहसील कार्यालयात सुपूर्द करावेत, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



राजू रोकडे यांचा मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पक्षप्रवेश पार पडला. याप्रसंगी संतोष गागरे, संतोष शिंदे, संतोष मोरे, अमोल रोकडे आदींनी पक्ष प्रवेश केला. यावेळी आमदार काशिनाथ दाते, जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, आमदार अमोल मिटकरे, आमदार शिवाजीराव गर्जे उपस्थित होते.

# रस्ता सुरक्षेविषयीची गीते विनोद सगरे यांच्याकडे सुपुर्द

नगर – रस्ता सुरक्षेविषयी सुमारे १५ प्रकारची गीते तयार करून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सदरे यांना कवी, गीतकार ॲलेक्स कदम यांनी दिली.



कवी, गीतकार ॲलेक्स कदम यांनी रस्ता सुरक्षेविषयी १५ प्रकारची गीते तयार करून उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद सदरे यांच्याकडे सुपुर्द केली. (छाया – सरवर तांबटकर)

राज्यात दररोज अपघात मोठ्या प्रमाणात होतात. त्यामुळे नागरिकांमध्ये व विशेषत: शालेय विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण व्हावी, त्यासाठी हे गीत तयार करण्यात आले आहेत, अशी माहिती ॲलेक्स कदम यांनी दिली.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

